**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या**
**सार्वत्रिक निवडणूका-२०२५**
**बॅलेट युनिटवरील END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद ठेवण्याबाबत....**

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक- रानिआ-२०२५/प्र.क्र.११/का.१४
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक २७.११.२०२५

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का-१२, दि. २९/१२/२०२२ चे आदेश.

## आ दे श

**ज्याअर्थी,** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे;

ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) प्रत्येक मतदाराला दोन ते पाच मते देण्याचा अधिकार आहे. या तरतुदींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता विकसीत केलेल्या मतदान यंत्राच्या बॅलेट युनिटवर शेवटचे (१६ वे बटण) END बटण ठेवले आहे.

ज्याअर्थी, सन २०१३ मध्ये राज्य निवडणूक आयोगाने भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराला मतपत्रिकेवरील कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसली तरी त्याला आपला मतदानाचा हक्क गोपनियरित्या बजावता यावा याकरीता मतदान यंत्रावर “वरीलपैकी एकही नाही” (NOTA) हा पर्याय राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२ दि. १२ नोव्हेंबर, २०१३ च्या आदेशान्वये उपलब्ध करुन दिला व सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता बॅलेट युनिटवरील END बटण बंद राहील असे आदेश काढले व त्याअनुषंगाने योग्य त्या तरतुदी दि. २६ नोव्हेंबर, २०१३ रोजीच्या आदेशान्वये केल्या.

ज्याअर्थी,राज्य निवडणूक आयोगाने मतदाराला मतदान यंत्रावरील END बटण वापरुन मतदान प्रक्रिया पूर्ण करता यावी या दृष्टीकोनातून सदर दि. १२ नोव्हेंबर,२०१३ च्या आदेशात सुधारणा करुन व दि. २६ नोव्हेंबर,२०१३ चे आदेश अधिक्रमित करुन संदर्भाधिन दि. २९ डिसेंबर,२०२२ च्या आदेशान्वये मतदान यंत्रावरील END बटण कशाप्रकारे वापरण्यात येईल याबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत.

ज्याअर्थी, END बटणाचा वापर करुन निवडणुका घेताना स्थानिक पातळीवर येणाऱ्या विविध अडचणी क्षेत्रिय अधिका-यांनी निदर्शनास आणून दिल्या असून  सदर अडचणी विचारात घेता END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी**, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए; तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ अ(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-अ (४), महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९ अ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ (४) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून संदर्भाधिन आदेश अधिक्रमित करुन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांकरिता बॅलेट युनिटवरील END  बटण न वापरण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत. :-

१. दि. २९ डिसेंबर, २०२२ चे मतदान यंत्रावरील END बटणाच्या वापराबाबतचे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

२. त्यामुळे आता राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १२ नोव्हेंबर, २०१३ च्या आदेशातील तरतुदीनुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या  निवडणुकांकरीता END बटण पांढऱ्या मास्किंग टॅबने बंद राहील.

३. बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता अन्य सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदाराला दोन ते पाच मते देण्याचा अधिकार आहे. एखाद्या मतदारास बॅलेटींग युनिटवर लावलेल्या मतपत्रिकेवरील उमेदवारांना मतदान करण्याची इच्छा/

नसल्यास तो "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) या पर्यायासमोरील बटण दाबून आपला मतदानाचा हक्क गोपनीयरित्या बजावू शकतो.

४. मात्र काही मतदार मतदान कक्षात आल्यानंतर आपले मतदान पूर्ण करणार नाहीत अथवा कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसली तरी "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) या पर्यायासमोरील बटण दाबण्याससुध्दा नकार देतील, त्याठिकाणी मतदान यंत्र पुढील मतदाराच्या मतदानासाठी सज्ज करण्याच्या दृष्टीने खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

i) कोणताही मतदार आपले मतदान पूर्ण न करता मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर मतदान अधिकारी/मतदान केंद्राध्यक्ष यांना कंट्रोल युनिटवरील लाल दिवा न विझल्यामुळे व बिप साऊंड न वाजल्यामुळे मतदाराने, मतदान पूर्ण केले नाही ही गोष्ट लक्षात येईल.

ii) अशा परिस्थितीत मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देऊन पसंतीच्या उमेदवाराला मत देऊन अथवा "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबून मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी.

iii) जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन त्यानुसार त्याला देय असलेल्या मतदानाच्या संख्येएवढे मतदान केल्यास, त्याठिकाणी त्या मतदाराची मतदान प्रक्रिया पूर्ण होईल.

iv) मात्र जर एखाद्या मतदाराने पसंतीच्या उमेदवाराला मत देण्यास अथवा " वरीलपैकी एकही नाही " (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलेट युनिटवरील उमेदवारांचे नावासमोरील दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत. त्यानंतर मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने ज्या मतपत्रिकेवरील मतदान अपूर्ण राहिले

आहे, त्या मतपत्रिकेवरील " वरीलपैकी एकही नाही " (NOTA) या पर्यायासमोरील बटण / यथास्थिती बटणे स्वत: दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करावी.

v) उपरोक्त कार्यपध्दतीचा अवलंब करताना मतदान केंद्राध्यक्षाने मतदाराने केलेल्या मतदानाची माहिती कोणालाही होणार नाही, याची पुरेशी खबरदारी घ्यावी.

vi) जर एखाद्या मतदाराने मतदान कक्षात जाण्यापूर्वीच मतदानास नकार दिला तर अशा मतदाराच्या मतदार नोंदवहीतील (व्हीएम-१) नोंदीसमोर अभिप्राय या रकान्यात मतदानास नकार दिल्याची नोंद घ्यावी. याठिकाणी नोंदविलेल्या मतांच्या हिशोबामध्ये (व्हीएम-३) अनुक्रमांक ३ येथे अशा मतदारांची संख्या नमूद करण्यात येईल.

vii) **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशीन (EVM) तयार करताना (Commissioning of EVM) सर्व बॅलेट युनिट वरील "END" बटन हे कॅन्डीडेट सेटींग झाल्यानंतर ताबडतोब पांढऱ्या रंगाच्या मास्कींग टॅबने बंद ठेवण्यात यावे.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( सुरेश कांकाणी ) २८.११.२०१४

सचिव

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति-१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२
२. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
७. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
८. आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती.